जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३४७ दिनांक - १०/०५/२०२३**

## सायबर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## आंतरराज्यीय विमा पॉलीसी फ्रॉड करणा-या सराईत आरोपीस अटक

पुण्यातील नामांकित डॉक्टर यांची पॉलीसी देण्याच्या बहाण्याने २०१३ पासुन ते आजपोवतो वेग-वेगळया मेल आयडी व कॉलिंगसाठी मोबाईल नंबरचा वापर करुन,वेग-वेगळया १८ बँकेचे ४१ बँक खात्याचा वापर करून तक्रारदार यांना पॉलिसीचे पैसे परत करुन देतो असे खोटे सांगुन,त्यांचा विश्वास संपादन करुन त्यांना वांरवार वेग-वेगळया बँकेचे खात्यावर पैसे भरायला सां्गुन,त्यांची एकुण २,०१,५०,३५३/- रुपयेची आर्थिक फसवणुक केली आहे. त्यामुळे तक्रारदार यांनी कायदेशीर तक्रार दिल्याने **सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं.५१/२०२१,भा.द.वि.कलम ४१९,४२०,३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (सी),६६(डी)** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वरील अत्यंत क्लिष्ट व गुंतागुंतीच्या गुन्हयाचे तपासा मध्ये गुन्ह्यात वापरलेले बँक अकाऊंट डिटेल्स, मोबाईल नंबर, वॉट्सअ‍ॅप नंबर या साधनांचा संबंधीत कंपन्याकडुन प्राप्त माहितीचे तांत्रिक विश्लेषण करुन नमुद गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेत असतांना,आरोपी **शहवान पुत्र सलिम अहमद,रा.लक्ष्मीनगर,दिल्ली** हा असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. सदर आरोपी हा सायबर पोलीस स्टेशन,आग्रा,उत्तर प्रदेश येथील दाखल गुरनं.१७/२०२२,भा.द.वि.कलम ४१९,४२०,३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(सी),६६(डी) यात अटक असल्याची माहिती मिळाल्याने त्यास मा.न्यायालयाचे प्रोडक्शन वॉरंटनुसार ताब्यात घेऊन सायबर पोलीस स्टेशन,पुणे शहर येथे आणुन त्यास दि.०९/०५/२०२३ अटक करण्यात आले आहे.

मा.न्यायालयाने त्यास दि.१३/०५/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.गुन्ह्याचा तपास चालु असुन सदर गुन्ह्या मध्ये या आधी **१)संदिप कुमार पुत्र धर्मपाल,रा.लक्ष्मीनगर गार्डन,लोणी,गाझियाबाद २)साहीब खान पुत्र नसीर अली,रा.गाव-पिढौना,कासगंज ३)तुआजिब खॉन पुत्र अकिल अहमद,रा.विढौणा,कासगंज यांना अटक केली आहे.**

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री. रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,आर्थिक व सायबर गुन्हे,श्री.श्रीनिवास घाडगे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,आर्थिक व सायबर गुन्हे,श्री.विजयकुमार पळसुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीमती.मिनल सुपे-पाटील यांचे मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक,चंद्रशेखर सावंत, पोलीस अंमलदार,प्रविणसिंह रजपुत, वैभव माने, अमोल कदम, किरण जमदाडे या पोलीस पथकाने यशस्वीरित्या पार पाडली. अशा प्रकारे विमा पॉलीसीचे बहाणा करुन फसवणुक करणारे गुन्हेगारांपासुन सावध राहण्याबाबत सायबर पोलीस स्टेशन, शिवाजीनगर,पुणे यांचेकडुन आवाहन करण्यात येत आहे.